## * ठळक वैशिष्ट्ये *

- शहरातील लोकांचे राहणीमान,जीवनमान सुधारणा करणे करिता,शास्वत करणेकरिता व परिसर सर्व सोयीयुक्त करणेकरिता मा.पंतप्रधान महोदय यांनी स्मार्ट सिटी योजनेची संकल्पना दि. २५/६/२०१५ रोजी घोषित केली. त्याअनुषंगाने देशातील प्रथमतः १०० स्मार्ट शहरे निवडणेकरिता स्पर्धात्मक पध्दतीने निवड करणेचे घोषित करणेत आले.
- प्रथम टप्प्यात स्मार्ट सिटी स्पर्धेत राज्यातून प्रथम १० शहरे निवडणेचे उद्दिष्ट केंद्र शासनाकडून राज्य शासनास देण्यात आले होते. त्याअनुषंगाने सोलापूर महानगपालिकेने पहिल्या टप्प्यात राज्य शासनाच्या पहिल्या १० शहरात येणेकरिता विहित नमुन्यातील प्रस्ताव तयार करून तो शासनाकडे सादर केला.शासन स्तरावर त्याची छाननी होऊन सोलापूर शहर हे राज्य शासनाच्या पहिल्या १० शहरात निवडण्यात आल्याचे राज्य शासनाकडून घोषित करण्यात आले.
- तद्नंतर स्मार्ट सिटी चॅलेंज-२ या स्पर्धेत देशातील एकूण ९८ शहरांची निवड करणेत येऊन त्यात प्रथम २० शहरांना पात्र ठरविणेकरिता विहित नमुन्यात प्रस्ताव सादर करणेबाबत शासन स्तरावरून सुचना प्राप्त होत्या. त्या अनुषंगाने सोलापूर शहराचा प्रस्ताव दि.१५/१२/२०१५ रोजी केंद्र शासनाच्या नगरविकास मंत्रालय, निर्माण भवन,नवी दिल्ली या ठिकाणी समक्षतेत उपस्थित राहुन सादर करणेत आला.
- सदरचा प्रस्ताव हा एकूण र.रू.२२४७.०० कोटी इतक्या रक्कमेचा क्रिसील कन्सलटंट,मुंबई यांचे मार्फत तयार करणेत आला होता.
- सदर योजना आराखड्यात,

  १) १००% कचरा व्यवस्थापन

  २) नॉन मोटरायईज्ड ट्रान्सपोर्ट करिता पायाभुत सुविधा करणे,सुधारणा करणे.

३) सायकल ट्रॅक तयार करणे.

४) क्लीन व इफिशियंट एनर्जी वापर करणे.

५) एफिशियंट ट्रान्सपोर्टेशन तयार करणे.

६) एफिशियंट पाणीपुरवठा करणे.

७) एफिशियंट वेस्ट वॉटर रिसायक्लिंग करणे.

८) एफिशियंट सार्व. ठिकाणचा योग्य वापर करणे.

९) शहरी गरीबांकरिता घरे बांधणे.

१०) पॅन सिटी सॉल्युशन देणे.

- सदर योजनेमध्ये प्रतिवर्षी सोलापूर महानगरपालिकेस पुढील पाच वर्षाकरिता र. रू. ५०.०० कोटी इतक्या रक्कमेची तरतूद स्वःहिस्सा म्हणून करणे आवश्यक आहे.
- दि.२८/१/२०१६ रोजी केंद्र शासनाकडून स्मार्ट सिटी स्पर्धेची प्रथम२० शहरांची नांवे घोषित करणेत आली असून, त्यामध्ये सोलापूर शहराचा ९वा क्रमांक घोषित करणेत आला आहे.
- देगांव मलनित्सारण केंदापासून टर्सरी ट्रीटमेंट करून NTPC साठी पाणी वापरास देणेचे नियोजन P.P.P. वर करणेची असून ,त्या अनुषंगाने महानगरपालिकेस करावे लागणारे कामासाठी खर्च करावा लागेल.सदर नियोजनामुळे NTPC साठी घालण्यात आलेले पाईपलाईन मधून ७५ एमएलडी पाणी महानगपालिकेस उपलबध होईल.
- महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत सोलापूर शहर मलःनित्सारण व्यवस्था सुधारणे–
- सदर मुळ योजनेची मंजूर किंमत (डी.पी.आर.) शासन मंजूर र.रू. १८७.३६ कोटी शासकीय अनुदान : ५० % प्रमाणे र.रू. ९३.६८ कोटी म.न.पा हिस्सा : ५०% प्रमाणे र.रू. ९३.६८कोटी इतका होता. परंतु

सुधारित शासन निर्णयानुसार शासकीय अनुदान ७०% व मनपा हिस्सा ३०% असा आहे. यानुसार सुधारित प्रस्ताव सादर करणेची कार्यवाही चालु आहे. या योजने अंतर्गत प्राधान्याने शहर हद्दवाढ पैकी झपाट्याने नागरीकीकरण होत असलेल्या विजापूर रोड व होटगी रोड या भागात नव्याने ड्रेनेजलाईन्स नियोजित आहेत व त्याच बरोबर सदरहु दोन्ही भागासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित स्वतंत्र मलप्रक्रिया केंद्र (Sewersge Treatment Plant)प्रस्तावीत आहेत.त्याचबरोबर शहर परिसरातील ज्या भागात ड्रेनेजलाईन्स नाहीत त्याभागात नव्याने ड्रेनेज व्यवस्था करणे व मुख्य ट्रन्कसिव्हर नव्याने घालणे तसेच अस्तित्वातील देगांव मलप्रक्रिया केंद्राचे जागेत अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत स्वतंत्र मलक्रिया केंद्र (Sewersge Treatment Plant)प्रस्तावित आहे. सदरची संपूर्ण योजनेकरिता महाराष्ट्र शासन अंगीकृत व या क्षेत्रातील अनुभवी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे कामकरुन घेणार आहे..सदरहु योजना पूर्ण झाल्यानंतर विजापूर रोड व होटगी रोड भागातील सांडपाणी व्यवस्थापन योग्य रितीने होणार असून ,शहर परिसरातील ड्रेनेज व्यवस्था पूर्ण क्षमतेने चालणार ओहे. तसेच भविष्यात अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित स्वतंत्र मलक्रिया केंद्र (Sewersge Treatment Plant) मुळे निर्माण होणारे प्रक्रिया केलेले पाणी व खत याचेही विक्रीतून म.न.पा.स महसूली उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे.

- सोरेगांव जलशुदीकरण केंद्र येथे ॲक्युलेटर रिस्र्कुशन टँक बांधून धुतलेल्या फिल्टर मधून वाया जाणारे पाण्याचा पुर्नवापर करणे.यामुळे दैनंदिन सुमारे ४ ते ५ एमएलडी पाण्याची बचत होणार आहे. साधारणतः दोन महिन्यात हे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

- महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजने (राज्यस्तर) रस्ते विकास प्रकल्प :

- महाराष्ट्र शासनाच्या सुवर्णजयंती वर्षानिमित्त राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यातील नगरपालिका/महानगरपालिका यांचे क्षेत्रातील विकास कामांकरिता अनुदान ५०% व सॉफ्टलोन ५०%असा विकास निधी उपलब्ध करणेत आलेला आहे. त्यामुळे संबंधीत नगरपालिका /महानगरपालिका क्षेत्रातील विविधि विकास कांमाकरिता राज्य शासना कडून निधी उपलब्ध झालेला आहे. प्रस्तुत योजनेतून सोलापूर महानगपालिकेने विकास योजना आराखडा १९९७-२०१७ मधील DP रस्ते (१२मि, १५, १८ मि. वगैरे) रस्ते प्रस्तावीत केलेले आहेत.या योजनेत ६२ कि.मी. लांबीचे एकूण २७ रस्ते विकसित करणेकरीता शासनाकडून पाहिल्या टप्प्यात र.रू. १८७.७७ कोटी प्रकल्प किंमतीस मंजूरी मिळालेली आहे. सदर रस्ते हे शहरात प्रवेश करणारे (Entrance road) दोन मुख्य रस्त्यांना जोडणारे रस्ते (Link road)अंतर्गत मोठे रस्ते (Internal road)याचा समावेश आहे. या योजनेतील ६०% रस्ते हे हद्दवाढ भागातील असल्याने हद्दवाढ भागात मोठया प्रमाणात विकास होणार आहे. सदर योजनेमध्ये १२ मिटर,१५ मिटर,१८ मिटर रूंदीचे (Fullwidth) ने रस्ते विकसित होणार असल्यामुळे सोलापूर शहरातील शहरवाहतुक अत्यंत सुरळीत व वेगवान होईल.

- नगरअभियंता विभागाअंतर्गत रस्ते विभागाकडील विकास योजना विकसीत करताना तसेच विकसीत झालेल्या रस्त्यावर खालील प्रमाणे कामाचे नियोजन करून रस्त्याचे स्वरूप अत्यंत देखणे करणे.

- अस्तित्वातील रस्त्यावर अविकसीत असलेले चौक मधील आयलँड सुशोभिकरण करणे.

- आरोग्य खात्याच्या अधिपत्याखाली असलेल्या प्रत्येक प्रसुतीगृहाची रंगसफेदी करणे, वैद्यकीय अधिकारी व इतर सेवकांकरिता योग्य प्रकारचे फर्निचर उपलब्ध करून देणे.
- प्रसुतीसाठी येणाऱ्या महिलांकरिता पिण्याच्या पाणीची सोय चांगल्या प्रकारचे प्रसाधनगृह व गरम पाण्याची उपलब्धता करणेकामी सोलर सिस्टीम बसविणे तसेच सोलर सिस्टीमद्वारे विद्युत सुविधा करणे.
- प्रसुतीगृहातील जनन वार्तच्या माहितीची प्रत संबंधीत नागरीकांस देऊन सदर वार्ताची माहिती (online) पध्दतीने म.न.पा. चे जन्म–मृत्यू विभागास कळविणे त्यामुळे नागरीकांना जन्म दाखले त्वरीत उपलब्ध होतील या कामाकरिता प्रसुतीगृहा कडील सर्व सेवकांना संगणक प्रशिक्षण देणे जरूरीचे आहे.
- कर आकारणी व हद्दवाढ विभागाकडील थकबाकी वसुलीसाठी विशेष मोहिमेअंतर्गत वसुल करून म.न.पा. चे उत्पन्न वाढीचे प्रयत्न करणेत येणार आहे.
- अक्कलकोट रोड एम.आ.डी.सी. भागातील मिळकतदारांकडून जो उत्पन्न येईल त्यातील ७०% इतकी रक्कम त्याच भागात विविध विकासाची कामे करणेत येईल.
- भांडवली मुल्यावर्धीत कर प्रणाली राबविणेत येणार असून ,त्यानुसार सर्व मिळकतकरांचे GIS प्रणाली द्वारे सर्वेक्षण करून टॅक्सची आकारणी करण्यात येणार आहे. त्यामुळे मनपाच्या उत्पन्नवाढीव मध्ये वाढ होणार आहे.
- शहराची भविष्यातील सन २०५१ ची लोकसंख्या गृहित धरून वाढीव पुरवठा व पाणीपुरवठात सुधरणा करणेकामी तज्ञ कन्सलटंट कडून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केलेला आहे. सदर प्रकल्पाची किंमत

र.रू.१२४०.५६ कोटी इतकी असून , त्यामध्ये उजनी धरणातून २६८.०० द.ल.लि. पाणी आणणेकरिता समांतर जलवाहिनी टाकणे,पाकणी व सोरेगांव येथे अनुक्रमे ६० व १०० द.ल.लि.क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र बांधणे,एकरूख योजना व भीमा यांजनेअंतर्गत आवश्यक दुरूस्त्या करणे,नव्याने ६ एम.बी.आर. बांधणे वगैरे कामाचा समाविष्ट आहे. सदर प्रकल्प अहवाल शासनाकडे मंजुरीस्तव व निधी प्राप्त होणेस्तव सादर करणेत आलेला आहे.

- शहराची भविष्यातील ३० वर्षाची लोकसंख्या गृहित धरून व सध्या शहराच्या ज्या भागात ड्रेनेजलाईन नाही अशा सर्व भागाचा सर्व्हे करून हद्दवाढ व शहरातील नव्याने ड्रेनेजलाईन टाकणेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून घेण्यात आलेला आहे. या प्रकल्पाची किमंत र.रू. ६१४.०० कोटी इतकी आहे. मा.म.न.पा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनंतर शासनाकडे मंजूरीस्तव सादर करणेचा आहे. यामध्ये दोन ठिकाणी मलनित्सारण केंद्र व पंपींग स्टेशन बांधणे कामाचा समाविष्ट आहे.
- धर्मवीर संभाजी तलाव (कंबर तलाव) संवर्धन व सुशोभिकरण करणेच्या दृष्टीने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेत आलेला आहे. सदर प्रकल्प अहवाल केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सरोवर संवर्धन कार्यक्रम अंतर्गत मंजूरीस्तव व निधी मिळणेस्तव सादर करणेत आलेला आहे. या प्रकल्प अहवालाची किंमत र.रू.७.५३ कोटी इतका आहे. यामध्ये केंद्र शासनाकडून ७० % व म.न.पा. हिस्सा ३०% इतका आहे. या प्रकल्प अहवालास राज्य शासनाने शिफारस करून सध्या केंद्र शासनाकडे पाठविणेत आलेला आहे. प्रकल्प अहवालामध्ये मुख्यतः तलावात येणारे सांडपाणी वळविणे,तलावातील भोवतालच्या भागातील गाळ काढणे तलावाभोवती चेनलिंग फेन्सींग करणे,जलपर्नी काढणे,टॉयलेट ब्लॉक बांधणे,तलावात जेट फाऊँटन बसविणे वगैरे कामाचा समावेश आहे.